## परिशिष्ट - अ

**शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या पाल्यांचा गुणवत्ता गौरव करताना विचारात घेतल्या जाणा-या बाबी :**

१. दरवर्षी विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या मुलांपैकी स्वतंत्रपणे दहावी गुणानुक्रमे पहिले तीन, बारावी विद्याशाखानिहाय तीन (कोणत्याही शाखेमधून गुणानुक्रमे अव्वल येणारे पाल्य) पदवी व पदव्युत्तर पदवी गुणानुक्रमे पहिले तीन (कोणत्याही शाखेमधून गुणानुक्रमे अव्वल येणारे पाल्य)
२. याबाबतीत कमीत कमी ६० टक्के गुण मिळविणे अनिवार्य राहील.
३. संबंधित शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या मुलांनी राज्य किंवा राष्ट्रीय पातळीवर क्रीडा स्पर्धेत विशेष प्राविण्य संपादित केले.
४. संबंधित शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या मुलांनी खेळामध्ये, सांस्कृतिक कार्यामध्ये व विविध स्पर्धामध्ये मिळविलेले विशेष प्राविण्य.

**विद्यापीठातील गुणी विद्यार्थीचा सत्कार करताना विद्यापीठातर्फे प्रदान करावयाच्या पारितोषिकांचा तपशिल**

अ) इयत्ता १० वी, १२ वी, पदवी व पदव्युत्तर पदवीत पाहिल्या प्रयत्नामध्ये कमीत कमी ६० टक्के किंवा त्या पेक्षा जास्त गुण घेणा-या एकूण तीन पाल्यांचा गुणत्तेनुसार विद्यापीठाच्या वर्धापन दिनादिवशी गुणवंत पाल्य म्हणून प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह व खालीलप्रमाणे रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात येईल.

| बक्षिसे | इयत्ता १० वी साठी बक्षिसाची रक्कम | इयत्ता १२ वी साठी बक्षिसाची रक्कम | पदवी अभ्यासक्रमासाठी बक्षिसाची रक्कम | पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी बक्षिसाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| | | (कोणत्याही शाखेमधून गुणानुक्रमे अव्वल येणारे पाल्य) | | |
| प्रथम | रु.२५००/- | रु.२५००/- | रु.२५००/- | रु.२५००/- |
| द्वितीय | रु.१५००/- | रु.१५००/- | रु.१५००/- | रु.१५००/- |
| तृतीय | रु.१०००/- | रु.१०००/- | रु.१०००/- | रु.१०००/- |

ब) ज्या वेळेस दोन पाल्यांना समान गुण असतील तर त्यावेळेस पुरस्कार विभागून देण्यात येईल.

क) इयत्ता १० वी व १२ वी मध्ये उत्तीर्ण झालेल्या पाल्यांची संख्या तीन पेक्षा कमी झाल्यास बक्षीसाची रक्कम ठरविण्याचा अधिकार मा.कुलगुरु महोदयांना राहील.

ड) तसेच विद्यापीठाच्या वार्षिक अहवालामध्ये सत्कार समारंभाच्या योग्य त्या मथळयाखाली उल्लेख केला जाईल.